प्रबंध घोषवारा

“विदर्भातील नाभिक समाजातील ग्रामीण व शहरी सलून व्यावसायिकांवर आधुनिकीकरणाचा झालेला परिणाम एक तौलनिक अभ्यास: विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा”.

(२०१०-११ ते २०१९-२०)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. पदवीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. या विद्यापीठात सादर करावयाचा शोध प्रबंधाचा घोषवारा

• संशोधक•

महाजन शुभम अविनाश

एम.ए.,सेट.(अर्थशास्त्र), बी.एड.,(सी.टी.ई.टी)

• मार्गदर्शक •

प्रा.डॉ. पांडुरंग बी. पाटील

प्राध्यापक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सेनगाव. ता. सेनगाव. जिल्हा. हिंगोली

२०२०-२०२१

"विदर्भातील नाभिक समाजातील ग्रामीण व शहरी सलून व्यावसायिकांवर आधुनिकीकरणाचा झालेला परिणाम एक तौलनिक अभ्यास: विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा".
(२०१०-११ ते २०१९-२०)

प्रस्तावना:-

भारत हा खेड्यांचा देश आहे. खेडी ही प्राचीन काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत स्वयंपूर्ण होती. खेड्यातील लोकांचा मुख्यतः व्यवसाय हा शेती होता. शेती व शेतीक्षेत्राशी संबंधित संपूर्ण घटकांचा ग्रामीण जीवनात महत्त्वपूर्ण सहभाग होता. या सहभागात प्रत्येक समाजात एक वेगळ्या स्वरूपाची रचना दिसून येत होती. त्यामुळे ग्रामीण जीवनात व्यवसायानुसार लोकांना त्यांच्या कामाच्या स्वरूपावरून ओळखल्या जात होते. त्यातून काही कालांतरा नंतर जातीव्यवस्थेची सुरुवात झालेली दिसून येते, त्यानंतर कालांतराने जातीव्यवस्था दृढ होत गेली आणि ते आता भारतात समाजव्यवस्थेचे एक अंगभूत वैशिष्ट्ये म्हणून ओळखल्या जाते. कृषिप्रधान अर्थव्यवस्था असल्यामुळे समाजातील प्रत्येक घटक परस्परांवर अवलंबून असतो. जेव्हा जेव्हा परकीय लोकसमूह येत, तेव्हा तेव्हा त्यांच्या व्यवसायांसह ते ग्रामसंस्थेत दाखल होत व स्थिरावत, व्यवसायांची हमी वंशपरंपरागत मिळत असे. त्यांविषयी हक्क आणि कर्तव्ये निर्माण होत. समाजात ते काटेकोरपणे पाळीत असे. पिढ्यांपिढ्या एकच व्यवसाय असणे याचादेखील भारतीय जनजीवनाच्या जडणघडणीवर फार मोठा प्रभाव पडला. समाज घटकानुसार लोकांची आर्थिक स्थिती कंमकुवत ठरण्यास परंपरागत व्यवसाय हे फार मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरले. व्यवसायावरून जात याप्रमाणे, लोखंडाच्या सळया बनवणे – लोहार, चप्पल व बूट बनवणे – चांभार, सोन्याचे दागिने बनवणे – सोनार, मडकी तयार करणे – कुंभार, केस कापणे – न्हावी (नाभिक) असे जातीनुसार व्यवसाय करायचे व त्या व्यवसायावरून जात ओळखली जात असे.

यापैकीच एक समाज म्हणजे नाभिक समाज, वैदिक काळात नाभिक समाजाची चौथ्या क्रमांकाच्या म्हणजेच शुद्र या वर्णात गणना होत होती. न्हावी म्हणजे पुरुषांचे केशवपन, केशकर्तन, श्मश्रू (दाढी) करणे, केशभूषा, केशसज्जा इत्यादींचा व्यवसाय करणारी व्यक्ती असते. याला नापित, नाभिक, वारीक, न्हावी, म्हाली (महाला), हजाम असेही शब्द आहेत. कंगवा, कैची व वस्तरा ही न्हावी वापरत असणारी प्राथमिक साधने आहेत. केशकर्तनासाठी विजेवर किंवा बॅटरीवर चालणारी अनेक साधने सध्या उपलब्ध आहेत. नाभिक कारागीर हा कुशल कामगार आहे. इतर कुशल कामगार निर्जीव वस्तूंवर किंवा यंत्रावर आपले कौशल्य वापरून काम करतात, वस्तूंचे उत्पादन करतात किंवा इतर प्रकारच्या सेवा पुरवतात. नाभिक समाज हा ग्राहकांना वैयक्तिक स्वच्छता देऊन सौंदर्य खुलवण्याचे काम करतात. मुंबईस पहिला न्हावीखाना (हेअर कटिंग सलून) लोणकर बडनेरकर यांनी काढला असे म्हणतात. नंदन कालेलकर हा लंडनला जाऊन केस कापण्याचे आधुनिक तंत्र शिकून आधी मुंबईत आणि नंतर पुण्यात सलून काढणारा पहिला न्हावी / नाभिक होय.

गुजरात मध्ये आणि महाराष्ट्रातही हे लोक लग्न जुळविण्यांत मध्यस्थ असतात. गावभर फिरून ते लग्नाची बोलावणी करतात. ज्या ठिकाणी जुनी शंकराची मंदिरे आहेत त्या ठिकाणी सनई-चौघडा, ढोल, तुतारी, नगारा वाजविण्याचे काम घडशी समाजातील कलावंतांकडे असते. मात्र, महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये हेच काम नाभिक करतात. नाभीक हे पूर्वी शस्त्रक्रिया करून तुंबड्या लावीत. तसेच त्यांच्या बायका सुईणीचा व्यवसाय करत. यामुळे त्यांना चांगला आर्थिक मोबदला मिळे. ही माणसे जावळ काढणे, जखमा साफ करणे, नारु रोगाचे उपचार करणे, ही कामे करतात. बऱ्याच ठिकाणी लग्नघरातील स्वयंपाकाची व्यवस्था लावणे हे काम नाभिक समाजातील लोक करतात. काही ठिकाणी तथाकथित उच्चवर्णीयांच्या जेवणावळीत न्हावी हा पाणी वाढतो. राजा महापद्मानंद नाभिक समाजाचे होते.

याच समाजाची आजची म्हणजे २१ व्या शतकातील आर्थिक व सामाजिक स्थिती ही फार बिकट आहे. आधुनिकीकरण हे बदलत्या जगाचे उस्फुर्त रुप होय. आज सर्वच क्षेत्रात आधुनिकीकरणाने उडी घेतली आहे. केशकर्तनालय व्यवसायही त्यास अपवाद नाही. या व्यवसायात देखील आधुनिकीकरण मोठ्या प्रमाणावर झाले आहे. आधुनिक मशीन्स केशकर्तनालय व्यवसायात वापरण्यात येत असून त्यामुळे सेवांचा दर्जा उत्कृष्ट झाला आहे. शिवाय या मशीनमुळे कामाची गती देखील वाढली आहे. तथापि आधुनिकीकरणासाठी मोठे भांडवल देखील लागते आणि स्वतंत्र प्रशिक्षणही आवश्यक आहे. शिवाय यात इतरही काही समस्या उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचा परिणाम नाभिक समाज व्यावसायिकांवर मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. नवीन अद्यावत घटकांच्या उपलब्धता, वापर व वाढते आर्थिक फायदे यामुळे इतर समाजातील व्यक्ती या व्यवसायात मोठ्या प्रमाणात गुंतलेले दिसून येतात. त्यामुळे मुळतः सलून व्यवसाय करणाऱ्या समाजाला यापासून मोठ्या प्रमाणात नुकसान दिसून येते.

नाभिक समाजाचा इतिहास व आर्थिक पार्श्वभूमी:-

प्राचीन कालखंडाचे प्रागैतिहासिक काळ व ऐतिहासिक काळ असे दोन प्रकार पडतात. प्रागैतिहासिक काळामध्ये मानवाला लेखन कला माहीत नव्हती. साधारणतः हा काळ सुमारे दशलक्ष वर्षे इतका प्राचीन आहे. ज्या काळाचा लेखी इतिहास उपलब्ध आहे. त्यास ऐतिहासिक काळ म्हणतात. हा काळ ५ ते ६ हजार वर्षांपूर्वीचा आहे. या प्रकारे वैदिक कालखंडापासून (आर्यांचे आगमन) लिखित पुरावे सापडले आहेत. आणि त्यावरून इतिहासाला दिशा मिळाली. प्रागैतिहासिक कालखंडामध्ये वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था यामध्ये प्रश्नच उद्भवत नाहीत. मात्र वैदिक कालखंडापासून (ऋग्वेदकाळ) वर्ण व्यवस्था तर, वैदिक उत्तर कालखंडापासून (ब्राह्मणकाळ) जातिव्यवस्थेचे मूळ भारतात रुजलेली पाहायला मिळतात. पूर्व वैदिक कालखंडात इतर व्यावसायिक वर्गाबरोबर रंगारी, न्हावी, कोळी, नर्तक यांचाही व्यावसायिक गट होता. वडिलांचा व्यवसाय त्यांची मुले करीत. केश-भूषेचे विविध प्रकार त्यांना माहित होते. जगातील सर्वात जुना ग्रंथ ऋग्वेदामध्ये केशकर्तनालय याचा उल्लेख आहे. याचा अर्थ त्या काळी नाभिक समाज अस्तित्वात होता. “सामवेद” चार वेदांपैकी एक वेद. या वेदाचे रचयिता सविता ऋषी ते पहिले क्षौर कार्य (मुंडन) करणारे होते. याचा स्पष्ट उल्लेख ऋग्वेद व अथर्ववेद या मध्ये केला आहे. या सविता देवाने अग्निपुत्र

सोहळ्याचे वस्तरा आणि गरम पाण्याच्या सहाय्याने मुंडण करून त्याला शिष्य म्हणून दीक्षा दिली. कारण ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या वर्णांतील दीक्षा देण्यासाठी किंवा यज्ञ करण्यासाठी मुंडन करणे (केस कापणे) अनिवार्य होते. तेव्हा वैदिक काळात आर्यांमध्ये दीक्षा देणारा गुरु नाभिक होता. भारतामध्ये प्राचीन काळात विचार करता जातिव्यवस्थे पेक्षाही वंश परंपरा अधिक प्रभावी असल्याचे काही पुराव्यावरून सिद्ध होते. नाभिक समाजाने आपल्या व्यवसायाबरोबर महत्त्वाच्या कार्यात सहभाग नोंदविला याचे पुरावे प्राचीन काळात सापडतात. इ.स. ६०० पर्यंत श्रेणी व्यवस्थेचे अंतिम विघटन होऊन त्यांची जागा बलुतेदार या सामाजिक घटकाने घेतली.

भारतीय इतिहासाची पाने चाळतांना येथील चातूरवर्ण व्यवस्थेची जाणीव होते. वैदिक काळात नाभिक समाजाची चौथ्या क्रमांकाच्या म्हणजे शुद्र या वर्णात गणना होत होती. हे जरी वास्तव असले तरी उच्चवर्णीया एवढीच विद्वत्ता आणि सामाजिक सण उत्सवात त्यांचा सहभाग असायचा. त्यामुळे नाभिक समाजाला गाव पातळीवर इतर उच्चवर्णीय घटकांइतकेच महत्त्व होते. तसेच त्यांचा राबता, सामाजिक धनिक लोकांमध्ये होता. कारण त्यांची वाणी आणि कुलीन चरित्र उच्चवर्णीयापेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नव्हते. समाजाचे एवढे महत्त्वाचे सामाजिक स्थान आणि कर्तुत्व असलेल्या नाभिक समाजाला भारतीय समाजात आणि विविध भागात विविध नावाने ओळखले जाते.

विदर्भातील नाभिक समाजाची लोकसंख्या:-

अ.क्र.	जिल्हा	लोकसंख्या
	पूर्व विदर्भ	
१	नागपूर	२,२०,५६६
२	भंडारा	४५,४३३
3	गोंदिया	४३,००६
४	चंद्रपूर	८३,११६
५	गडचिरोली	३८,७९८
६	वर्धा	४९,२२५
	(अ)एकूण	**४,८०,१४४**
	पश्चिम विदर्भ	
१	बुलढाणा	८९,०५३
२	अकोला	६५,१७२
३	वाशिम	४०,७८९
४	अमरावती	१,०४,२४३
५	यवतमाळ	९८,४२०
	(ब) एकूण	**३,९७,६७७**
	(अ)+(ब) एकूण	**८,७७,८२१**

संदर्भ : नाभिक संघर्ष दर्पण २०१६ पा.क्र. ४१

वरील सारणी वरून असे दिसून येते की, २०११ च्या जनगणनेनुसार विदर्भातील नाभिक समाजाची एकूण लोकसंख्या ८,७७,८२१ होती. यात पूर्व विदर्भातील नाभिक समाजाची लोकसंख्या ४,८०,१४४ तर पश्चिम विदर्भातील लोकसंख्या ३,९७,६७७ होती. पूर्व विदर्भातील नागपूर जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे २,२०,५६६ लोकसंख्या आहे. तर गडचिरोली जिल्ह्यातील नागरिकांची संख्या सर्वात कमी ३८,७९८ इतकी आहे. पश्चिम विदर्भातील सर्वाधिक नाभिक समाजाची लोकसंख्या असणारा जिल्हा अमरावती असून लोकसंख्या १,०४,२४३ इतकी आहे. तर सर्वात कमी नाभिक समाज असणारा जिल्हा वाशिम असून लोकसंख्या ४०,७८९ इतकी आहे. यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांची संख्या ९८,४२० इतकी आहे. हे प्रमाण पश्चिम विदर्भातील एकूण लोकसंख्येशी २२.४८ टक्के आहे. अर्थात ग्रामीण समाजाचे शहरी स्थलांतरण होत असल्याने शहरातील एकूण लोकसंख्या वाढीबरोबर नाभिक समाजाची लोकसंख्या देखील वाढली आहे.

एवढी लोकसंख्या असणाऱ्या समाजात कमीत कमी आर्थिक गुंतवणूक करून जास्तीत जास्त नफा मिळवून देणारा त्यांच्या पारंपरिक व्यवसायात व्यावसायिकांवर आधुनिकीकरणाचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यामुळे या विषयाचा अभ्यास करण्याची आवश्यकता वाटते.

नाभिक समाज व्यावसायिकांची महाराष्ट्रातील सद्यस्थिती:-

महाराष्ट्रातील नाभिक समाजाला न्हावी, म्हाली, हजाम, इत्यादी नावाने ओळखले जाते. राज्यात सुमारे ३ लाख लहान-मोठी केशकर्तनालय असून नाभिक महामंडळाच्या झेंड्याखाली नाभिक समाज एकत्रित येत आहे. नाभिक महामंडळाने ‘काम तेथे दाम’ हा नारा देऊन बलुतेदारी संकुचित केली असली तरी काही भागात अजूनही अस्तित्वात आहे. ग्रामीण भागात नाभिकाला अजूनही एक विश्वासू म्हणून पाहिले जाते. बलुतेदारी पद्धतीत नाभिक समाजाला गावोगावी जाऊन सेवा करावी लागते. फारच थोड्या नाभिक बांधवांकडे पुरेशी जमीन आहे. बहुतेक नाभिकबांधव रोजी रोटी साठी फक्त केशकर्तन व्यवसायावरच अवलंबून असतात. काही गावात व्यवसायिक दर-वाढ ही गावातील मंडळी त्यांना करू देतनाहीत म्हणून अनेक कारागिरांची कुचंबनाहोत असते. अल्प मोबदल्यात काम करावे लागल्यामुळे दिवसाकाठी १५ ते १६ तास त्याला काम करावे लागते. साप्ताहिक सुट्टीही घ्याविशी वाटत नाही. त्यामुळे त्याच्या कुटुंबियांची शैक्षणिक प्रगती व्हावी तशी होत नाही. शहरातून मात्र नवीन पिढी शिकताना दिसते. ग्रामीण भागात शिक्षणाच्या अभावामुळे व्यसनाधीनतावअंधश्रद्धा यांचा प्रभाव या समाजावर मोठ्या प्रमाणात आहे. बारा बलुतेदारांपैकी फक्त नाभिक हा एकच बलुतेदार आज पारंपारिक व्यवसाय करताना आढळतो. शहरातील जी मोठ-मोठी केशकर्तनालयाची दुकाने दिसतात. ती सर्व नागरिक बांधवांची नसून बहुतांशी उच्च वर्गीय समाजातील लोकांची असतातवतेथे नाभिक समाज बांधव नोकर म्हणून काम करतात. तसेच हजारो नाभिक कारागीर शहरात फुटपाथवर तर ग्रामीण भागात पिढ्यांपिढ्या पारंपरिक पद्धतीने हा व्यवसाय करीत राहिल्यामुळे हा व्यवसाय आता कालबाह्य ठरू पाहत आहे. शहरातील धनिकमंडळीच्या आक्रमणामुळे नाभिक समाज / कारागीर रस्त्यावर फेकला जात आहे. त्याचे वास्तव स्वरूप कच्च्या घरांच्या रूपाने दिसून येते. मुलांना शिक्षण सोडून आपल्या पित्याला

व्यवसायात मदत करावी लागते. अपुऱ्या उत्पन्नामुळे त्याला महागडी वैद्यकीय औषधे परवडत नाहीत. तसेच ग्रामीण भागात सकस आहाराच्या अभावामुळे त्याचे सरासरी आयुर्मानही कमी असल्याचे दिसून आले आहे. समाज बहुश्रुत असला तरी समाजाने आपल्या मागण्या सातत्याने शासनापुढे किंवा तत्सम संस्थांपुढे प्रभावीपणे मांडू शकता न आल्यामुळे या समाजाची प्रगती झालेली दिसून येत नाही.

यवतमाळ जिल्हा:-

यवतमाळ जिल्हा उत्तर अक्षांश १९०२६- २००४२ आणि पूर्व रेखांश ७७१८- ७९९८ या दरम्यान वसलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस अमरावती जिल्हा, पश्चिमेस वाशिम, पूर्वेस चंद्रपूरआणि दक्षिणेस नांदेड जिल्हा आहे. यवतमाळ जिल्ह्याचे क्षेत्र विस्तृत असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने अमरावती विभागातील सर्वात मोठा जिल्हा असून महाराष्ट्रातील ६ वा मोठा जिल्हा आहे. यवतमाळ जिल्ह्यास पूर्वेला व दक्षिणेला नैसर्गिक सीमा प्राप्त झाल्या आहेत. वर्धा नदीमुळे वर्धा व चंद्रपुर जिल्हा पूर्व दिशेला आणि दक्षिणेस पेनगंगा नदीमुळे नांदेड जिल्हा यवतमाळ जिल्ह्यापासून वेगळा झाला आहे. क्षेत्र व प्रशासकीय विभाग: यवतमाळ जिल्ह्याचे क्षेत्रफळ२०११ च्या जनगणनेनुसार १३.५८२ चौ.कि.मी. असून महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी हा भूभाग ४.४ टक्के आहे. यवतमाळ जिल्हा दारव्हा, पुसद, वणी, यवतमाळ, केळापूर उमरखेड व राळेगाव अशा एकूण सात राजस्व उपविभागामध्ये विभागलेला आहे. १ मे १९८१ पासून केलेल्या तालुक्यांच्या पुनर्रचनेनुसार नवनिर्मित नऊ तालुक्यासह दारव्हा, यवतमाळ, पुसद, केळापुर, दिग्रस, वणी, नेर, बाभुळगाव, महागाव, उमरखेड, राळेगाव, घाटंजी, मारेगाव व कळंब असे एकूण चौदा तालुके होते. त्यानंतर १५ ऑगष्ट १९९२ पासून झरी-जामणी व आर्णी या दोन नवीन तालुक्यांची निर्मिती करण्यात आली. अशा प्रकारे यवतमाळ जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या १६ झाली आहे. नवनिर्मित झरी जामणी तालुक्यामध्ये मारेगाव आणि केळापूर (पांढरकवडा) तालुक्यातील काही गावांचा समावेश केला आहे. तर आर्णी या नवीन तालुक्यामध्ये दिग्रस आणि घाटंजी तालुक्यातील काही गावांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्याचे मुख्यालय यवतमाळ असून विभागीय मुख्यालय अमरावती आहे.

संशोधन विषयाची निवड:-

संशोधनासाठी "विदर्भातील नाभिक समाजातील ग्रामीण व शहरी सलून व्यावसायिकांवर आधुनिकीकरणाचा झालेला परिणाम एक तौलनिक अभ्यास: विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा". (२०१०-११ ते २०१९-२०) हा विषय निवडण्यामागे संशोधकाला अनेक घटकांनी प्रोत्साहित केले. समाजातील विविध घटकात नाभिक समाजाला शोषित, कुंठित, बलुतेदारी अवस्थेत लाचार, गुलाम अवस्थेत जगाव लागलेल्या तसेच पारंपारिक व्यवसायापेक्षा वेगळ्या वाटाशोधणाऱ्या नाभिक समाज व्यावसायिकांच्या आर्थिक व सामाजिक अध्ययनास महत्त्व देण्यात आले आहे. आधुनिकीकरणातील विविध बदलांना सामोरे जाण्याची नसलेली त्यांची क्षमता व त्यामुळे समाज व्यावसायिकांवर झालेले परिणाम या अनुषंगाने या विषयाची निवड करण्यात आली. नाभिक समाजाला शासकीय आर्थिक सहायता आत्तापर्यंत किती प्रमाणात मिळाली? समाजाची आर्थिक स्त्रोत व आर्थिक स्थिती यामधून उत्पन्न होणाऱ्या समस्यांचा ऊहापोह करणे. ते घटक जाणून घेणे या उत्सुकतेने या विषयाची निवड करण्यात आली.

आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यात १६ तालुके असून प्रत्येक तालुक्यात सरासरी ३ ते ४ टक्के लोकसंख्या नाभिक समाजाची असतांना समाज व्यावसायिक असंघटित व आर्थिकग्रस्त का..? या प्रश्नाची उकल व्हावी यासाठी या संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे. व्यवसायासाठी कमी प्रमाणात असलेली गुंतवणूक दीर्घकालीन स्वरूपाची असताना व श्रमिक स्वरूपात व्यवसायिक स्वतः असताना समाज व्यावसायिकांची आर्थिक स्थिती का खालावत जात आहे..? नवीनीकरणांचा व्यावसायिकांवर होणारा परिणाम. याचा अभ्यास करण्याची आवश्यकता वाटल्याने हा विषय निवडण्यात आला. व्यावसायिकांचा, शैक्षणिक, आरोग्यविषयक समस्याबरोबर आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे देखील महत्त्वाचे वाटते कारण नाभिक समाज व्यावसायिक मोठ्या प्रमाणात आर्थिक व सामाजिक समस्यांना तोंड देत आहे. नाभिक समाजाच्या आर्थिक, सामाजिक किंवा एकंदरीत सर्वांगीण विकासासाठी चिकित्सक अभ्यास करून शिफारशी व उपाय- योजनायांचे अवलंबित्व हे महत्त्वाचे वाटले. त्या मधून नक्कीच नाभिक समाजाचा सर्वांगीण विकास साधता येईल.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

संशोधन ही प्रगतीची जननी असल्यामुळे संशोधन जर समाज उपयोगी नसेल तर समाजाची प्रगती होऊ शकत नाही. त्यामुळे संशोधनासाठी निवडलेला “विदर्भातील नाभिक समाजातील ग्रामीण व शहरी सलून व्यावसायिकांवर आधुनिकीकरणाचा झालेला परिणाम एक तौलनिक अभ्यास: विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा”. (२०१०-११ ते २०१९-२०) हा विषय नाभिक समाज व्यावसायिकांच्या स्थितीवर प्रकाश टाकण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा वाटल्याने हा विषय निवडण्यात आला आहे. नाभिक समाज व्यावसायिकांवर त्यांचा आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकून त्यावर उपाययोजनांवर प्रकाश टाकणारे संशोधन फार महत्त्वाचे वाटले. यातून नाभिक समाज व्यावसायिकांच्या व्यवसायात नवनवीन तंत्रज्ञान, नवीन उपकरणांचा वापर, नवनवीन व्यावसायिक शैक्षणिकीकरण, समाजात पारंपरिक व्यवसायात इतर समाजातील लोकांचा हस्तक्षेप या मुळे नाभीक समाज व्यावसायिकस्थितीवर पडणाऱ्या परिणामाच्या करणांवर भर घालण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरणार आहे. या संशोधनातून यवतमाळ जिल्ह्यातील नाभिक समाज व्यावसायिकांची आर्थिक व सामाजिक माहिती प्राप्त होईल. हे संशोधन यवतमाळ जिल्ह्यातील नाभिक समाज व्यावसायिकांच्या नवीन बदल स्वीकृतीमधील त्रुटी शोधून ते दूर करण्यासाठी उपयुक्त ठरेल व या संशोधनातून राष्ट्राला नाभिक समाजाच्या आर्थिक कल्याणासाठी विशेषधोरण ठरविण्यास मदत होईल. तसेच हे संशोधन देशात अल्पसंख्यांक समाजाचा आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी विशेष महत्त्वपूर्ण उपयुक्त असे प्रतिपादन (मॉडेल) देऊ शकते.

संशोधन विषयाची उद्दिष्टे :-

१) नाभिक समाज सलून व्यावसायिकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) नाभिक समाजातील ग्रामीण व शहरी सलून व्यावसायिकांना आधुनिक तंत्रज्ञान वापरताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

३) नाभिक समाजातील ग्रामीण व शहरी व्यावसायिकांच्या पायाभूत सुविधा संदर्भातील समस्यांचा अभ्यास करणे

४) आधुनिक तंत्रज्ञानाचा नाभिक समाजातील ग्रामीण व शहरी सलून व्यावसायिकांवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

५) यवतमाळ जिल्ह्यामधील नाभिक समाजातील उच्च व व्यावसायिक शिक्षणाचा अभ्यास करणे.

प्रस्तुत संशोधनाची परिकल्पना / गृहितके :-

१) नाभिक समाजातील व्यावसायिकांची आर्थिक स्थिती निम्न दर्जाची आहे.

२) नाभिक समाजातील ग्रामीण सलून व्यावसायिकांना आधुनिक तंत्रज्ञान वापरतांना शहरी व्यावसायिकांच्या तुलनेत अधिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

३) नाभिक समाजातील ग्रामीण व शहरी सलून व्यवसायिकांना उपलब्ध असणाऱ्या मूलभूत सोयी-सुविधांमध्ये तफावत आढळून येते.

४) तौलनिक दृष्ट्या ग्रामीण भागातील नाभिक व्यावसायिकांना शहरी भागातील व्यावसायिकांच्या तुलनेत अधिक समस्या उद्भवतात किंवा अधिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

५) यवतमाळ जिल्ह्यामधील नाभिक समाजात उच्च व व्यावसायिक शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे.

संशोधन पद्धती:-

वर्णनात्मक संशोधन पद्धत:-

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती प्रमाण वापरण्यात येणार आहे. विशिष्ट व्यक्ती, समूहांच्या वैशिष्ट्यांचे किंवा लक्षणांचे यथातथ्य वर्णन करणे हा वर्णनात्मक अध्ययनाचा हेतू असतो. हे लक्षात घेता संशोधकांनी अशा संशोधनास अनुकूल ठरणाऱ्या संशोधन पद्धतीची निवड केली आहे. संशोधकांनी विविध शास्त्रीय पद्धतीचा आणि तंत्राचा उपयोग संशोधनात केलेला आहे. ती तंत्रे पुढील प्रमाणे आहेत.

अ. प्राथमिक साधन सामग्री:-

प्राथमिक तथ्य संकलनातील प्रश्नावली हे महत्त्वाचे साधन मानले जाते. प्राथमिक स्त्रोतामध्ये मुलाखती, अनुसूची, प्रश्नावली, प्रत्यक्ष निरीक्षण याद्वारे माहिती संकलन केले जाते. स्वतः तथ्य संकलन केल्यामुळे त्यांची विश्वसनीयता वाढते. यामुळे प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक साधनसामग्रीचा उपयोग करण्यात येणार आहे.

ब. द्वितीय साधन सामग्री :-

प्रस्तुत संशोधन विषयाची अधिक माहिती मिळविण्यासाठी शोधनिबंध, प्रबंध, संदर्भ पुस्तके, मासिके, नियतकालिके, दैनिक, वेबसाईट इत्यादी दुय्यम साधनांचा वापर केला जाणार आहे.

नमुना निवड तंत्र:-

नाभिक समाज संपूर्ण देशभर विखुरलेला असून संशोधन क्षेत्र खूप व्यापक आहे. ज्या समग्र किंवा विश्वाच्या विशिष्ट लक्षणांच्या बाबतीत निष्कर्ष काढावयाचा असेल तर त्या विश्वाच्या किंवा समग्राच्या एका भागाच्या अध्ययनवरून त्या विश्वातील विशिष्ट लक्षणांबाबत निष्कर्ष काढले जातात. याभाग निवडण्याच्या पद्धतीस नमुना निवड तंत्र म्हणतात. संभवत: नमुना निवड "ज्याद्वारे संपूर्ण समूह किंवा लोकसंख्या यांना परीक्षणाचे क्षेत्र मानुन संशोधन व सर्वेक्षण केले जाते". गैरसंभाव्यता नमुना निवड: संपूर्ण समूह किंवा लोकसंख्येचे एका विशिष्ट प्रतिनिधिक समूहाची निवड करून अध्ययन केले जाते.

प्रस्तुत अध्ययनासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धती व यादृच्छिक नमुना पद्धतीने यवतमाळ जिल्ह्यातील गावाची निवडवगावातील उत्तरदात्यांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुके यांना समान प्रतिनिधित्व देऊन प्रत्येक तालुक्यातून कुटुंबांची संख्या या आधारावर प्रत्येक तालुक्यातील ग्रामीण भागातून ४ गावे अशी एकूण ६४ गावेव शहरी लोकसंख्या असलेल्या १६ तालुक्याची ठिकाणे अशी एकूण ८० गावाची निवड करण्यात येईल. ८० गावांपैकी ग्रामीण भागातून ६४ गावातून प्रत्येकी ३ कुटुंब या प्रमाणे १९२ कुटुंबे वशहरी लोकसंख्या असलेल्या १६ तालुक्याच्या ठिकाणाहून प्रत्येकी १० कुटुंब याप्रमाणे १६० कुटुंबे अशी एकूण ३५२ कुटुंबांची निवड करण्यात येणार असून,निवडलेल्या या ३५२ कुटुंबप्रमुखांची मुलाखत व अनुसूचीद्वारे संशोधनाची उदिष्टयनिहाय तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

संशोधन अध्ययनाचा कालखंड :-

"विदर्भातील नाभिक समाजातील ग्रामीण व शहरी सलून व्यावसायिकांवरआधुनिकीकरणाचा झालेला परिणाम एक तौलनिक अभ्यास: विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा". या प्रस्तुत विषयाच्या संशोधनाचा कालखंड हा २०१०-११ ते २०१९-२० असा आहे.

संशोधन अध्ययनाच्या मर्यादा:-

प्रस्तुत संशोधनासाठी २०१०-११ते२०१९-२० या कालखंडाचा विचार केला आहे. नाभिक समाजाच्या अध्ययनासाठी १० वर्षाची मर्यादा घालण्यात आली आहे. संशोधनासाठी विशेष संदर्भ म्हणून संपूर्ण यवतमाळ जिल्ह्याची निवड केली असली तरी या सर्व भागात जाऊन मुलाखत घेणे, निष्कर्ष काढणे, वेळ, पैसा, उपलब्ध सुविधा व वैयक्तिक मर्यादा लक्षात घेता शक्य नसल्यामुळे प्रत्येक तालुकानिहाय नाभिक समाजाची जास्त संख्या असलेल्या गावांची निवडक गावातील नाभिक समाज व्यावसायीकांच्या मुलाखती घेऊन हे संशोधन पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच सर्वच नाभिक समाज खरी माहिती देतील असे नाही. त्यामुळे वेळ, क्षेत्र आणि गोपनीयता यामुळे संशोधनाला मर्यादा आहेत.

संशोधन प्रकरणाची रूपरेषा:-

सदर प्रबंधाची सात प्रकरणांमध्ये विभागणी करण्यात येणार असून ती पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण पहिले:- प्रस्तावना

या प्रकरणात नाभिक समाजाची पार्श्वभूमी तसेच नाभिक समाजाचा अर्थ, भारतातील नाभिक समाज, महाराष्ट्रातील नाभिक समाज, यवतमाळ जिल्ह्यातील नाभिक समाज, त्यांची वैशिष्ट्ये, समस्या व उपाय योजना इत्यादी बाबीचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे:- संशोधन पद्धती आणि संदर्भ साहित्याचा आढावा

या प्रकरणात संशोधन विषयाची निवड, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधन पद्धती, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनातील नमुना निवड, तथ्य संकलन, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाच्या मर्यादावसंदर्भ साहित्याचा आढावा इत्यादी घटकांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे:- यवतमाळ जिल्ह्याची आर्थिकवभौगोलिक संरचना

या प्रकरणात यवतमाळ जिल्ह्याची आर्थिक आणि सामाजिक माहिती दिली जाणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील भौगोलिक स्थान, नैसर्गिक साधनसंपत्ती, कृषी, उद्योग, सेवा क्षेत्र आणि भौगोलिक क्षेत्र तसेच शिक्षण, आरोग्य, बेकारी, मानव विकास निर्देशांक इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे:- नाभिक समाज व्यावसायिकांवर आधुनिकीकरणाचा झालेला आर्थिकपरिणाम

या प्रकरणांमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील नाभिक समाज व्यावसायिकांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे. माहिती संकलित करून माहितीच्या आधारावर व्यवसाय, उत्पन्न, खर्च, आर्थिक मदत इत्यादी संदर्भात अभ्यास केल्या जाणार आहे. तसेच नाभिक समाज व्यावसायिकांवर आधुनिकीकरणाचा झालेला परिणाम याअध्ययनाच्या संदर्भात या समाजात जे नव- नवीन तंत्रज्ञान, नवीन पद्धती, लहान- मोठीयंत्रसमग्री, वेग- वेगळे अभ्यासक्रम शिबीरे, प्रशिक्षण शिबीरे (कोर्स), या मुळे पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या नाभिक समाज व्यावसायिकांवर झालेल्या परिणामाचे आर्थिक अध्ययन केले जाणार आहे.

प्रकरण पाचवे:- शासकीय योजना आणि महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे योगदान

नाभिक समाजाला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय प्रश्न सतत भेडसावत असतात. त्यांना शासकीय योजनांचा आणि महाराष्ट्र नाभिक महामंडळाचा कितपत लाभ होतो. किती कुटुंबांची स्थिती त्यामुळे सुधारते. शासकीय योजनांची ध्येय धोरणे या समाजापर्यंत कितपत पोहोचतात,यांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे:- प्राथमिक व द्वितीय साधन सामग्रीचे विश्लेषण.

सदर प्रकरणात संशोधनाअंती प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीचे सारणीकरण करून विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे:- निष्कर्ष व शिफारशी.

या प्रकरणात विश्लेषणाच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या निष्कर्षाची नोंद करण्यात येईल. या बरोबरच आवश्यक त्या प्रमाणात शासनाला व इतर तत्सम संस्थांना संबोधून योग्य त्या नवनवीन शिफारशी करण्यात येतील. तसेच निष्कर्षासोबतच गृहीतकांची पडताळणी करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :-

I. भगवान वैद्य (संपादक)(२००८) 'नाभिक समाजाचा इतिहास' भिमाई प्रकाशन, सुरज मोहलूला, सेलू.

II. डॉ. लुलेकर प्रल्हाद. (१९९५)'बलुतेदार' संवेदना प्रकाशन, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

III. चव्हाण शशिकांत.(२००९) 'नाभिक समाज गौरवग्रंथ', राष्ट्र, मित्र चेंबूर नाका, मुंबई.रामदास नामदेव चव्हाण. 'जाती आणि जमाती' प्रकाशन सुनील मेहता, मेहता पब्लिकेशन हाऊस, सदाशिव पेठ पुणे३०. पहिली आवृत्ती मार्च १९८९, दुसरी आवृत्ती सप्टेंबर१९९५, तिसरी आवृत्ती फेब्रुवारी२०००.

IV. श्री. अनंत घोळवे.(२०१३) 'संत सेना म्हणे', सूर्यचंद्र प्रकाशन, माळी गल्ली, कागल.

V. प्रा. रा. रा. गोसावी, सौ. विना गोसावी.(२०१२)'संत सेना महाराज चरित्र' सारथी प्रकाशन, पुणे.

VI. श्री. भिमराव जगताप. (२०१३)'संत सेनामहाराज आणि नाभिक समाज' लोकसाहित्य प्रकाशन, सिडको, औरंगाबाद.

VII. आगलावे प्रदीप, (२०१६)सामाजिक संशोधन पद्धती शास्त्रवतंत्र, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, सहावी आवृत्ती.

VIII. कोठारी. सी.आर. (१९९९)संशोधन पद्धती शास्त्रवतंत्र, दुसरी आवृत्ती. नवी दिल्ली.

IX. शरद पवार (माजी केंद्रीय कृषि मंत्री). 'नाभिक समाजाची स्वतंत्र महामंडळ' दै. लोकमत२फेब्रुवारी२०१४.

X. हेमंत लागवणकर. 'सलून ते संशोधन.. एक शोधयात्रा' दै. लोकसत्ता दि. १४/ ०२/ २०१४

XI. दै. पुण्य नगरी दि. २२मार्च२०१५ रविवार.

XII. दै. सकाळ दि. २७मार्च२०१६रविवार.

XIII. दै. संध्यानंद दि. ३नोव्हेंबर२०१६गुरुवार.

XIV. दै. लोकमत दि. २३मे२०१७मंगळवार.

XV. www.censusindia.gov.in

XVI. www.wikipedia.com

महाजन शुभम अविनाश
(संशोधक)

प्रा.डॉ. पांडुरंगबी. पाटील
(मार्गदर्शक)